# आनंदी वाटांवरची
# आनंदाची झाडे!



## मधुरांगण दिवाळी
• २०२३ •

# मधुरांगण

प्रकल्प

(खाटपेवाडी, भुकुम)

|| श्री ||

स्वरूपसेवा संस्थेचा मधुरांगण हा एक अनोखा प्रकल्प आहे. विविध आश्रमात राहणाऱ्या समाजातील अनाथ, अंध, अपंग, मतिमंद व निराधार वयोवृद्ध यांच्यासाठी मधुरांगण हे एक हक्काचं सेकंड होम आणि एक आनंद घर आहे. इथे फक्त याचं मंडळींना आमंत्रित केलं जातं आणि त्यांना आयुष्यात आनंदाचे काही क्षण लाभावेत यासाठी स्वरूपसेवा संस्था सातत्याने प्रयत्न करीत असते.

उठा उठा दिवाळी आली... असं म्हणत खरंच दिवाळी उंबरठ्यावर येऊन ठेपली आणि स्वरूपसेवेच्या मधुरांगण प्रांगणालाही सजण्याचे वेध लागले. या सणाच्या वेळी मन प्रसन्न असतं कारण जीवलगांच्या भेटी होतात. मधुरांगणच्या परिसरात यावेळी येणार होते चिमुकले नातेवाईक जे रक्ताच्या नात्याने नव्हे तर प्रेमाच्या नात्याने जोडले गेले!

या दिवाळीत, बारामती तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागात असलेल्या एका अनाथालयातील ४० मुलं-मुली व त्यांची काळजी घेणारे असे सर्व ११ ते १५ नोव्हेंबर दरम्यान स्वरूपसेवा संस्थेच्या खाटपेवाडी, भुकुम येथील मधुरांगण प्रकल्पात दिवाळी साजरी करण्यासाठी पाहुणे म्हणून आले होते. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी या अनाथालयातील मुलांसाठी यंदाची दिवाळी अविस्मरणीय व आनंददायी व्हावी यासाठी प्रत्येक दिवसाचं अगदी काटेकोरपणे नियोजन केलं होतं. आपल्या घरी जशी आपण दिवाळी साजरी करतो, अगदी त्याच पद्धतीनं येथे नियोजन केलं होतं.

ज्ञान-आरोग्य-क्रिडा हा पाया
स्वरूप सेवा हे जीवन व्रत

स्वरूपसेवा

# ११ नोव्हेंबर

या चिमुकल्या पाहुण्यांचं मधुरांगण मध्ये प्रेमपूर्वक स्वागत करण्यात आलं. त्यांना स्वरूपसेवा संस्था व मधुरांगण येथील परिसराचा परिचय करून देण्यात आला.किल्ला आणि दिवाळी हे एक अतूट नातं. आपल्या अंगणात आपण स्वतः केलेला किल्ला हा लहानग्यांच्या स्वाभिमानाचाच विषय असतो. त्यामुळे या प्रेमाच्या अंगणात सायंकाळी मुलांनी एक फार सुरेख किल्ला बनवला.



त्यांना अभय खेडकर, पियुष शहा व मित्र परिवाराने मार्गदर्शन केलं. विशेष म्हणजे किल्ल्यावरील मातीची चित्रं ही या मुलांनीच तयार केली. किल्ल्या- वरील मावळे, सैन्य, गावकरी, तोफा व प्राणी अशी विविध चित्रं मुलांनी बनवली आणि त्यांना रंगही दिले. यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्या सौ.मेघना माने ह्यांनी एक कार्यशाळा घेतली. त्यांनी या लहान मुलांना शाडूच्या मातीपासून किल्ल्यावरची चित्रं करायला शिकविले.











# १२ नोव्हेंबर

## • नरक चतुर्दशी आणि लक्ष्मी पूजन •

पहाटेचा सुखद गारवा, पणत्यांनी उजळलेला मधुरांगणचा सर्व परिसर आणि सोबत सनईचा मधुर स्वर अशा आनंददायी वातावरणात लेकरं जागी झाली. आश्रमातल्या काटेकोर दिवसापेक्षा हा दिवस जरा अधिकच वेगळा उगवला मुलांसाठी.



संस्थेतील कार्यकर्त्या सौ.अंजली कात्रे, शिल्पा चव्हाण, चिन्मया हर्षे, मेघना माने, सपना नवेले, विजयता सुतार, MIT-WPU मधील प्राध्यापिका सौ.रश्मी वारके व श्री.भूषण हर्षे, प्रभाकर सुतार, ओंकार हिंगे यांनी या लहान मुलांना सुगंधी तेल व उटणं लावून अंघोळ घातली. यासाठी पाट मांडले गेले.भोवती रांगोळीची आरास सजली. यासाठी लागणारे सुगंधी उटणे, तेल, साबण हे सर्व सौ. वासंती पुरोहित यांनी प्रेमाने पाठविले होते. सर्व मुलांना नवे कपडे देण्यात आले. यानंतर मधुरांगण परिसरातील श्री गजाननाच्या मंदिरात पहाटे पूजा व आरती करण्यात आली. सौ.अंजली कात्रे यांनी नरकचतुर्दशी, नरकासुराचा वध, लक्ष्मीपुजन व या दिवसाचं महत्व यासंबंधी मुलांना माहिती दिली. सौ. अंजली कात्रे, श्री. आनंद पाळंदे, श्री. अखिल काटकर, सौ. ज्योती शाळिग्राम यांनी प्रेमाने घरून बनवून आणलेला दिवाळी फराळ सकाळी बच्चे कंपनीला देण्यात आला. फराळ म्हणजे या दिवसाचा कळसाध्यायच असतो. त्यानंतर मधुरांगण परिसरात एक छोटी भटकंती करण्यात आली.










गिरिप्रेमीचे गिर्यारोहक श्री.विवेक शिवदे यांनी मुलांचे मनोरंजक खेळ घेतले. दुपारी मुलांचं आरोग्य, हलका व्यायाम व चांगल्या सवयी याबाबत डॉ.संजय शिवदे यांनी मुलांना मार्गदर्शन केलं. त्यांनी मुलांना भारतीय संस्कृतीतील विविध सण व त्यांचं महत्त्व याबाबत खूप छान माहिती दिली.

दुपारी मुला-मुलींसाठी रांगोळी व चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. मुलांमधे कल्पकता असते फक्त तिला वाव देणारं व्यासपीठ आपण त्यांना द्यावं लागतं ते मुलांना इथे मिळालं.



थोड्या विश्रांतीनंतर लगेचच संध्याकाळच्या लक्ष्मीपूजनाची तयारी चालू सुरू झाली. फुलांच्या माळा, विद्युत रोषणाई व अनेक आकाश कंदील यांनी मधुरांगणचा परिसर सजलेला होता. संध्याकाळी सात वाजता संस्थेमध्ये या मुलांच्या हस्ते लक्ष्मीपूजन करण्यात आलं. यानंतर मुलांनी भरपूर फटाके उडवले. या शोभेच्या फटाक्यांनी मधुरांगणचा परिसर उजळून निघाला होता. रात्रीच्या सुग्रास भोजनानंतर मुलांना शिवरायांच्या जीवनावर आधारित सुंदर चित्रपट दाखवण्यात आला ज्यात मुलं रंगून गेली.



# १३ नोव्हेंबर



पहाटे एव्हरेस्टवीर श्री.आशिष माने, श्री.शशिकांत सोमण, सौ.आर्या जोशी, स्वाती कडू व इतर कार्यकर्त्यांबरोबर मुलं परिसरातील एका टेकडीवरती छोट्या ट्रेकसाठी गेली होती. आपल्याच परिवारातील गिरिप्रेमी या गिर्यारोहण संस्थेतील स्वयंसेवकांबरोबर पदभ्रमण नाही असं कसं होईल? श्री. शशिकांत सोमण सर यांनी तेथून दिसणारा एनडीएचा परिसर, खडकवासला जलाशय, दूरवर ढगांमध्ये दिसणारा सिंहगड, सह्याद्रीच्या पर्वतरांगा यांबद्दलची माहिती मुलांना दिली. त्यामुळे शिवकालीन इतिहास आणि परिसराचा भूगोल दोन्हीची उजळणी झाली. मुलं म्हणजे माकडंच ती! पटापटा चढली आणि चटाचटा उतरली!





दुपारच्या सत्रात दैनिक लोकसत्ताचे सहसंपादक श्री.अभिजीत बेल्हेकर यांनी किल्ले, त्यांचा परिसर, किल्ल्यांचे महत्त्व, किल्ल्यांचा इतिहास यांबाबतचा परिचय स्लाईड शो द्वारे मुलांना फार सुंदर पद्धतीने करून दिला. श्री. राजेंद्र जगदाळे यांच्यासोबत आलेल्या सौ. प्रिया वैद्य व त्यांची कन्या कु. सानिका वैद्य, तसेच आनंदक्षण प्रशालेच्या शिक्षिका सौ.आर्या जोशी, स्वाती कडू यांनी मुलांना ओरिगामी कलेची माहिती दिली व कागदाचे पक्षी, पानं, फुलं करण्याचं प्रात्यक्षिक सादर केलं. याचसोबत श्री. राजेंद्र धायारकर यांनी मोठे आकाशकंदील बनवण्याचे कच्चे साहित्य दिले होते. या मुलांनी ते जोडून मधुरांगण मध्ये उठून दिसतील असे आणखी मोठे आकाश कंदील बनवले. दिवसभर समाजातील विविध क्षेत्रात काम करत असलेली मंडळी मुलांच्या भेटीला मधुरांगण मध्ये येत होती.



संध्याकाळी जादूगार मेहबूब यांनी मुलांना जादुई दुनियेची सफर घडवली. मुलांनी जादूच्या प्रयोगांचा भरपूर आनंद घेतला. जादूचे प्रयोग सुरू असताना अखंड हास्य कल्लोळात रमलेली मुलं पाहणं हा एक सुखद अनुभव होता. जादूगारकाका हातचलाखी कशी करतात हेही काही चाणाक्ष मुलांनी टिपलं बरं का!

श्री. माधव भिडे व सौ. योगिनी भिडे यांनीही मुलांसाठी विशेष खाऊ आणला होता. रात्री मुलांसाठी मधुरांगण टॅलेंट-शो आयोजित केला होता. यात मुलांचा अगदी उत्स्फूर्त सहभाग होता. मुलांनी आपल्या विविध कलागुणांचं सादरीकरण केलं. वक्तृत्व, नकला, गायन, नृत्य यांनी कार्यक्रमात खूपच धमाल आली. इतकी उत्साहात होती मुलं की आपण दमलो आहोत हेही मुलांना समजलं नव्हतं. आश्रमातील मुलांचे शिक्षक, कलाकार, नृत्य दिगदर्शक आणि कोरिओग्राफर श्री.सुरज शिंदे यांनी या मुलांवर केलेले कलासंस्कार जाणवत होते. शिंदे सर स्वतः कविता करतात. मुलं आणि सरांचं बाँडिंगही आम्हाला खूप जाणवलं. सरही या आश्रमशाळेतच लहानाचे मोठे झाले आहेत.





# १४ नोव्हेंबर

## ◆ दिवाळी पाडवा ◆

पाडवा म्हणजे नात्याचा गोडवा! मुलांसह आमचं एक गोड नातं गेले तीन दिवस तयार झालं त्यामुळे आमच्यासाठीही हा दिवस विशेष आनंदाचा होता. पहाटे संस्थेचे कार्यकर्ते श्री.कौस्तुभ ठकार यांनी मुलांना योगासनं शिकवली.





त्यानंतर श्री.कृतार्थ शेवगावकर यांनी मुलांबरोबर धमाल खेळ, गाणी व छोटी नाटके सादर केली. संध्याकाळी मधुरांगण टॅलेंट-शो मधील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. या प्रसंगी कुमार अगम गुप्ता व त्याचे पालक यांनी मुलांना खाऊ वाटला. तसेच बँक ऑफ बरोडाचे निवृत्त अधिकारी श्री.शशांक वाघ व मधुरांगणचे हितचिंतक श्री. हेमंत देशपांडे यांनी आणलेले शोभेचे विशेष फटाके उडविण्याचा आनंद मुलांनी घेतला.





संध्याकाळी पाणीपुरी, रगडा पॅटीस असा बेत होता. त्यामुळे मुलं खुश नसतील तरच नवल!

# १५ नोव्हेंबर

## ◆ भाऊबीज ◆

सकाळपासूनचं मुलांची लगबग चालू होती. आमच्या मनातही संमिश्र भावना दाटल्या होत्या. समाधान, आनंद याने भरलेले आमचे मन आणि मुलांना निरोप द्यायच्या भावनेने डोळ्यात नकळत हलकेच दाटणारं पाणी!  आज मुलं मधुरांगण मधून बारामती जवळील आपल्या आश्रमाकडे प्रयाण करणार होती. गेले चार दिवस भरपूर धमाल केल्यानंतर आज परतीचा दिवस उजाडला. पण पुन्हा येण्याच्या आग्रही निमंत्रणाने मुलांना प्रेमपूर्वक निरोप देण्यात आला.






असं म्हणतात की एक पाऊल एकत्र चाललं तरी मैत्री होते. इथे तर मुलांसह आम्ही अनेक पावलं चाललो त्यामुळे मैत्री तर झालीच होती!या संपूर्ण पाच दिवसांमध्ये स्वतःच्या घरातील दिवाळी बाजूला ठेवून संस्थेचे कार्यकर्ते श्री.सुहास साठये यांनी मुलांचे व आलेल्या सर्व पाहुण्यांचे भोजन व खाण्यापिण्याची व्यवस्था पाहिली. श्री. उमेश झिरपे, श्री.चंदन चव्हाण, श्री.कौस्तुभ ठकार, श्री.शेखर चंद्रचूड, श्री.मिलिंद भिडे, सौ. व श्री. मनोज शिवापुरकर हे सर्व कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्था पाहत होते. श्री.ओंकार हिंगे, प्रभाकर सुतार, संतोष नवेले व मुकेश कुमार यांनी मधुरांगणची सजावट व व्यवस्था पाहिली. श्री.सुयश मोकाशी यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून काम पाहिले.

आश्रमशाळेकडे परत निघताना या मुलांच्या प्रतिक्रिया खूपचं बोलक्या होत्या. खूप धमाल, दीपावलीतील आनंदाने भारलेलं वातावरण, अनेक गोड आठवणी व खूप सारं प्रेम यांची शिदोरी घेऊन ही मुलं आपल्या आश्रमशाळेकडे मार्गस्थ झाली. जाताना या मुलांचे व त्यांच्या शिक्षकांचे पाणावलेले डोळे आणि ही आगळी वेगळी दिवाळी कायमस्वरुपी सर्वांच्या आठवणीत राहील.

यांना का म्हणावं अनाथ /वंचित?ही मुलं त्यांच्या प्रेमाने, सहवासाने आपल्याला समृद्ध करतात. तीच आपल्याला सनाथ करतात आणि त्यामुळेच आपण देणारे आणि ते घेणारे ही भावना मागे पडते आणि एकाक्षणी हा सारा आनंद एकजिनसी होतो.समाजातील वंचितांसाठी सदैव तत्पर असलेले स्वरूपसेवक या आनंदवाटा शोधत, आनंदाची हलती डुलती, हसती खेळती झाडं पहात सुखावून गेले आहेत हे निःसंशय.आश्रमशाळेतील मुलांच्या सोबत दिवाळी साजरी करण्याच्या या अनोख्या उपक्रमास स्वरूपसेवा संस्थेचे हितचिंतक, देणगीदार आणि स्वयंसेवक यांनी विश्वासाने दिलेल्या भरघोस पाठिंबा हा भारावून टाकणारा होता.

या सर्वांना शत:श धन्यवाद...

| श्री. अजित पटेल | श्री. उमेश झिरपे | श्री. मिलिंद भिडे |
|---|---|---|
| अध्यक्ष, स्वरुपसेवा | संस्थापक विश्वस्त, स्वरुपसेवा | कार्यवाह, स्वरुपसेवा |

**अधिक माहितीसाठी संपर्क:**

9850093302/ 9822246962
**Email :** swaroopsevaorg@gmail.com
**Website :** https://swaroopseva.org/

**A/C Name :** Swaroopseva

**Bank Name:** IDBI

**A/C No.:** 50210010010007

**IFSC:** IBKL0000502

**Branch:** Apte Road, Pune

**Google Pay, PhonePe or any UPI :** 1000200403000001.9822246962@idbi

------------------

**OR**
**SCAN THE QR CODE**

## स्वरूपसेवा

द्वारा: उमेश म. झिरपे
१२३२, आपटे रस्ता, पुणे ४११००४

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्र. एमएच / ११०४२/ पुणे
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी क्र. एफ ११८८६/ पुणे

**देणगी आयकर सवलतीस पात्र.**

